# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


**कार्यासन क्रमांक २ अ** क्रमांक :- विकाअ/शिक्षण/सफलता/२०१८/3071

दिनांक :- 27 DEC 2018

**प्रति,**

**प्राचार्य,**

सर्व खाजगी विनाअनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेसंदर्भात.**

संदर्भ :- मा.संचालक, तंशिस, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :-
२अ/एडीएम/प्रवेश पडताळणी व मान्यता/२०१८/१५९२ दि. १९ डिसेंबर २०१८.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या www.saflta.org या संकेतस्थळावर अद्ययावत करण्याकरीता कळविण्यात आलेले होते. त्यानुसार सदरहु अद्यावत केलेल्या प्रवेशीत विद्यार्थ्यांची यादी प्रवेश नियामक प्राधिकरण मुंबई यांच्यामार्फत बाहय यंत्रणेकडून नियुक्त तपासणी पथकाने आपल्या संस्थेमध्ये येऊन तपासणीचे काम सुरु केले आहे.

याव्दारे आपणास कळविण्यात येते की, ज्या संस्थेचे प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेमार्फत बाहय यंत्रणेकडुन नियुक्त तपासणी पथकाने गुणवत्ता याद्या तपासणी केल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रामध्ये त्रृटया आढळुन आलेल्या आहेत अश्या विद्यार्थ्यांच्या संपुर्ण प्रमाणपत्रासह त्रृटीचे निराकरण करण्याकरीता **दिनांक २८/१२/२०१८ व २९/१२/२०१८ रोजी** या कार्यालयास उपस्थित राहुन या कार्यालयाचे प्रोग्रामर यांच्याकडून करुन घ्यावे. त्रृटीचे निराकरणाकरीता या कार्यालयात येतांना आपल्या संस्थेतील MAHADBT पोर्टलवर भरलेल्या अर्जाची स्थिती निरंक असणे आवश्यक आहे त्याशिवाय पुढील कार्यवाही केल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

तसेच आपणास कळविण्यात येते की, ज्या संस्थेची तपासणी झालेली आहे त्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्रात आढळुन आलेल्या त्रृटयांचे निराकरण दिनांक ३१/१२/२०१८ पर्यंत करण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविलेले आहे. त्यामुळे त्रृटयांचे निराकरण दिलेल्या कालावधीत करावे अन्यथा त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

(डॉ. डी.व्ही. जाधव)
सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी तसेच पुढील आवश्यक कार्यवाहीकरीता.

E:\backup old\backup kadam\all manish letter ghts 30.doc